माध्यमिक पुस्तकपेढी योजना
सन २०१८-१९ मध्ये ९ वी च्या पात्र लाभार्थ्यांना वाटप केलेल्या पाठ्यपुस्तकांच्या देयकाची रक्कम अदा करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१८/प्र.क्र.२५८/एस.डी.४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १२ मार्च, २०१९.

वाचा : १) शासन परिपत्रक ,वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.०२ एप्रिल,२०१८
२) शासन परिपत्रक ,वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.२५जानेवारी,२०१९
३)शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे पत्र क्र.पुपेयो/२०१८-१९/ २२३७६/माध्यमिक ब(३०६)/१३३६६, दि.२१ डिसेंबर,२०१८.

प्रस्तावना :

माध्यमिक पुस्तकपेढी योजना राज्यातील खाजगी तसेच जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदा मार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त व अनुदानप्राप्त माध्यमिक शाळा व शासकीय माध्यमिक शाळांतील विद्यार्थी/विद्यार्थीनींकरीता कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या योजनेनुसार विद्यार्थी संख्येच्या २५ टक्के मर्यादेत पात्र विद्यार्थ्यांना परतफेडीच्या तत्वावर पाठ्यपुस्तके देण्यात येतात व शैक्षणिक वर्षाअखेर ती परत घेण्यात येतात. नवबौध्द धरुन सर्व अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी या योजनेचे लाभार्थी आहेत. सदर योजनेखाली दिलेल्या पुस्तकांचा संच दर ३ वर्षांनी बदलून त्याऐवजी नवीन प्रती दिल्या जातात.

२२०२ ३६७३ (अनिवार्य) या लेखाशिर्षामधून सन २०१८-१९ या वर्षासाठी वाटप करण्यात आलेल्या पाठ्यपुस्तकांच्या देयकाची थकित रक्कम बालभारतीस तसेच वटाव रक्कम संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद अशी एकूण रु.८७,९६,१५९/- एवढी रक्कम देय आहे. सन २०१८-१९ करीता या लेखाशिर्षासाठी रु.९०,००,०००/- एवढी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीपैकी ८० टक्के रक्कम खर्च करण्यास वित्त विभागाने दिनांक २५ जानेवारी,२०१९ च्या परिपत्रकान्वये मंजूरी दिली आहे. त्यानुसार रू. ७२,००,०००/- एवढ्या उपलब्ध रकमेतून बालभारतीस व संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांना अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ करीता २२०२ ३६७३ (अनिवार्य) या लेखाशिर्षासाठी रु.९०,००,०००/- एवढी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीपैकी ८० टक्के रक्कम खर्च करण्यास वित्त विभागाने

दिनांक २५ जानेवारी,२०१९ च्या परिपत्रकान्वये मंजूरी दिली आहे. त्यानुसार रू. ७२,००,०००/- एवढ्या उपलब्ध रकमेतून बालभारतीस व संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांना अदा करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे. सदर निधी वितरणास मंजूरी मिळाल्यानंतर हा निधी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यात येईल. तसेच सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
संचालनालय, पुणे यांना या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणाऱ्या निधीकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. वित्त विभागाच्या दिनांक २०/०४/२०१६ च्या परिपत्रकानुसार खालील बाबी नमूद करण्यात येत आहेत.

१) वित्त विभागाच्या दिनांक १७/०४/२०१५ च्या परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत.

२) ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

३) दिनांक २०/०४/२०१६ च्या आदेशातील इतर मुद्दे या आदेशास लागू नाहीत.

३. निधी वितरणास मंजूरी मिळाल्यानंतर सदर बाबीवर होणाऱ्या खर्चाची रक्कम ही नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यात येईल. वित्त विभागाच्या दिनांक २४/०७/२०१५ व दिनांक २०/०४/२०१६ च्या परिपत्रकातील सुचनांनुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर खर्च "मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०,अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (००) (१३) माध्यमिक शाळांमधील पुस्तकपेढया (२२०२ ३६७३) ३१ सहायक अनुदाने योजनांतर्गत योजना" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०३१२१५२२४४४९२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Neha Nandkumar Humraskar

Digitally signed by Neha Nandkumar Humraskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fad9131f2c2ae9d6d9bb053715c4b9e08b15382beb01922a7bf2c233de3f7a45, cn=Neha Nandkumar Humraskar
Date: 2019.03.12 15:25:55 +05'30'

(नेहा हुमरसकर)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी,

१. महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे,
४. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती),पुणे,
५. कार्यासन अधिकारी, व्यय-६,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२,
६. कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प-६ कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२,
७. कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२,
८. निवड नस्ती एस.डी.४ कार्यासन.